The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि जीवन व्यवहार

संशोधक विद्यार्थी : बालाजी विठ्ठलराव नवरखेले, जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षक
मार्गदर्शक: प्रा. डॉ. राजू सायांना बडूरे मराठी विभाग, शिवाजी महाविद्यालय, परभणी.

महाराष्ट्राला संतांची जन्मभूमी असे म्हटले जाते. महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले. त्यातच ज्ञानेश्वरापासून ते तुकाराम महाराजांच्या जीवनकार्य, साहित्य यांना मराठी वाङ्मयाच्या इतिहासात उन्मेषवर्ष अशी नोंद आपल्याला आढळून येते. जवळपास ज्ञानेश्वर कालीन सर्वच संतांच्या जीवन व्यवहार कार्याला उन्मेषवर्ष असा उल्लेख करण्यात येतो. 'उन्मेष' या शब्दाचा अर्थ आहे दृश्यमान,मूळ,लोकप्रियता.

'ज्ञानदेव रचिला पाया। तुका झालासे कळस। या युक्तीनुसार ज्ञानेश्वर हे उन्मेषवर्षाचे आद्य प्रवर्तक असून, भक्ती सांप्रदायाच्या कार्याला पुढे कार्यरत ठेवणारे तुकाराम महाराज हे कळस होय. या काळामध्ये महाराष्ट्रात, महाराष्ट्राच्या संस्कृतीत वारकरी संप्रदायाची पायाभरणी झाली.अनेक जातीधर्मातून संतमहात्मे जन्माला आले. प्रत्येकाने आपल्या जीवन व्यवहाराला साधूत्वामध्ये विलीन करून टाकले. या संतांच्या कार्यातून जणू भक्ती युगाची सुरुवात झाली असे वाटते. उदार भावना, देवावरील अतूट विश्वास,कर्माला श्रेष्ठत्व अशा सदगुणांनी संतांचे जीवन व्यवहार व्यापले आहे. ज्ञानेश्वरा बरोबरच अनेक संतांनी साहित्य निर्मिती केली. त्याच्या त्या साहित्यातून समाजाला ब्रह्मविद्येची प्रचिती होते.या ब्रह्मविद्याच्या मुळाशी 'विठ्ठल, विठ्ठल' हे नामस्मरण प्रेरणास्थान ठरले. पंढरपूर हे संतांसाठी, संत कार्यासाठी मुख्य ठिकाण ठरले. याच्या जोडीला देहू, आळंदी ही संत धर्माची लोकविद्यापीठे ठरली.'ज्ञानोबा, तुकाराम' हा जयघोष संतकार्याचा आत्मा ठरला तर पंढरीची वारी ही संतांच्या कार्याचा, जीवन व्यवहाराचे शरीर बनले. या संस्कृतीचा प्रसार नामदेवाने भारत देशाच्या विविध भौगोलिक भागात केला. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर मध्ययुगीन भारतीय जीवनात अनेक संतांनी आपल्या संत साहित्यातून संत जीवन व्यवहार आणि कार्य यांची पर्वती उभा केली. आजच्या काळासाठी संत साहित्याची अभ्यास पद्धती आणि जीवन व्यवहार याचा विकास,अध्यन पठण व्हायला हवा असे वाटते.

मध्ययुगीन संतांचा काळ त्यांच्या कार्यालयासाठी प्रतिकुल होता. कारण सतत होणाऱ्या राजकीय, धार्मिक आक्रमणाने जनसमुदाय त्रस्त होता. जीवन आणि संपत्ती धोक्यात होती. मंदिरे, शिल्पे उध्वस्त होत होती. अशा परिस्थितीत स्वयसंरक्षणा शिवाय पर्याय नव्हता. तो मार्ग,पर्याय समाजाला कुठून सापडला असेल तर संत साहित्यातूनच. संतांच्या जीवन व्यवहारातून हे स्वीकारावे लागेल. याच काळात संस्कृतीचे मानचिन्ह असणारी मंदिरे, तीर्थक्षेत्र, शिल्पांची नासधूस होत होती. लाचारी, शरणागती, धर्मांतर याशिवाय संरक्षणाचा पर्याय उरला नव्हता. पौराणिक पोटार्थी परमार्थ साधत होते. सामाजिक विकासाच्या दिशा सर्वाच बाजूने बंदिस्त, हताश होऊन कोलमोडल्या होत्या. अशावेळी संत साहित्यातून समाजाला भयमुक्त जीवन प्रस्थापित करण्याचा सोनेरी मार्ग सापडला. संत साहित्य म्हणजे जणू जीवन मुक्तीचे प्रवेशद्वार. सदगुण संपन्न जीवन, स्वानुभूती आणि लोककल्याणाची उत्कट तळमळ या भूमिकेतून हे साहित्य निर्माण झाले आहे. अशा काळात उमेषवर्षाचे आद्य प्रवर्तक श्री संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञान, योग साधनेतून, शब्द अक्षरातून समाज प्रबोधन केले. आत्मविद्याची गंगाच प्रकट झाली. विश्वधर्माचे पसायदान सर्व समाजाला

विश्वाला लाभले. 'ईश्वर निष्ठांची मांदियाळी'। हे नव्या जीवन पद्धतीचे प्रकाशमय रूप ज्ञानेश्वरांनी समूह जीवनाला दिले. भेदभेदांची आडगळ दूर करून भक्तिमार्ग दाखवला. तो जणू काही पृथ्वीवर भक्तीचे प्रयोग विज्ञान निर्माण झाले. याचा अंतरंग आणि व्यापकता समजून घेण्याची भूमिका आजच्या समाजाला पार पाढणे आवश्यक आहे.

संत ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व, साहित्य आणि त्यांचे सामाजिक सांस्कृतिक प्रभाव लक्षात घेता असे लक्षात येईल की, त्यांची अध्ययन दृष्टी बहुविधी स्वरूपाची होती. म्हणूनच तर संत साहित्यामध्ये ज्ञानेश्वराविषयी आदर व्यक्त होताना आपल्याला दिसतो. 'ज्ञानराज माझी योग्याची माऊली' हे नामदेवाचे उद्गार. तसेच 'ज्ञानियांचा गुरु राज महाराज' असे उद्गार संत तुकारामाच्या वाणीतून प्रकट झाले. ते कसोटीत उतरताना दिसते. म्हणूनच तर म्हणतात संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला. 'ज्ञानेश्वरी' सारखा ग्रंथ मराठी भाषेत निर्माण करून समाजातील सर्वच घटकांनआत्मज्ञानाचेमार्गमोकळेकरूनदिले. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ जितका तत्वज्ञानात्मक ग्रंथ आहे, तितकाच तो काव्यग्रंथ म्हणूनही प्रसिद्ध आहे. अशा महान संताचा जन्म इ. सन १२७५ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यात आपेगाव या गावी झाला. संत ज्ञानेश्वर हे तेराव्या शतकातील महान संत आणि नामवंत कवी होते. त्यांना ज्ञानेश्वर, ज्ञानदेव, माऊली म्हणून ओळखले जाते. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या अलौकिक बुद्धीच्या जोरावर अनेक साहित्यरचना केली. जसे 'ज्ञानेश्वरी' यालाच आपण 'भावार्थदीपिका' असेही म्हणतो. 'चांगदेव पासष्टी', 'अमृतानुभव, 'हरिपाठाचे अभंग' असे विश्वव्यापक साहित्यरचना केलेली आहे. ज्ञानेश्वरी ही खरी पाहता भगवद्गीतेवरील भाष्य, टीका आहे. या साहित्यरचनेला मराठी साहित्यात अनमोल स्थान आहे. संत ज्ञानेश्वराच्या विचारांमध्ये अद्वैतवादी वेदांत, तत्त्वज्ञान आणि विठ्ठल भक्ती व योगावर भर देण्यात आला आहे. अध्यात्म आणि तत्त्वज्ञानिक विषय मराठीतून ही व्यक्त करता येतात असा विश्वास त्यांनी आपल्या साहित्यातून निर्माण केला. त्यामुळेच समाजातील सर्व थरातील लोकांना आध्यात्मिक प्रेरणा मिळाली. ज्ञानेश्वराने आपली काव्यरचना करताना बाप विठ्ठल, बाप रखुमाईवर, ज्ञाना, ज्ञानाबाई आणि ज्ञानदेव ही नावे ही वापरलेली आहे. 'हरिपाठ' या ग्रंथाच्या शेवटी त्यांनी नाथ संप्रदायाची गुरुप परंपरा सांगितलेली आहे ती अशी-: आदिनाथ- मच्छिंद्रनाथ- गोरक्षनाथ- गहिनीनाथ- निवृत्तीनाथ- ज्ञानेश्वर.

संत ज्ञानेश्वरांचे मोठे बंधू संत निवृत्तीनाथ हेच त्यांचे गुरु होते गुरुच्या कृपा आशीर्वादानेच त्यांनी निवासे क्षेत्रात गीतेवर टीका लिहिली. खरे पाहता ही टीका ज्ञानेश्वराने सांगितली व 'सच्चिदानंद बाबा' यांनी ती लिहिली आहे. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ मराठी वाङ्मयाचे देशीकार लेणे झाले आहे. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील ज्ञान संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत आणले. हे महान कार्य आहे. 'माझा मराठीची बोलू कौतुके। परी अमृता तेही पैजांसी जिंके। ऐशी अक्षरे रसिके। मेळवीन।' (ज्ञानेश्वरी-६.१४) असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे. कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग सांगणाऱ्या 'ज्ञानेश्वरीत' सुमारे ९००० ओव्या आहेत. असे हे महान अद्भुतसाहित्य रचना ज्ञानेश्वरांनी इ.स.१२९० मध्ये केली.

ज्ञानेश्वरांचा दुसरा ग्रंथ 'अमृताअनुभव हा आहे. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये दहा प्रकरणे आणि सुमारे ८०० ओव्या समाविष्ट केलेले आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा ग्रंथ श्रेष्ठ ग्रंथ मानला

जातो. 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवाचे गर्वहरण करून त्यांना उलट हाती उपदेश केला आहे. चांगदेव हे महान योगी होते त्यांना त्यांच्या ज्ञानावर अहंकार होता. योगी असून सुद्धा त्यांचा अहंकार गेला नव्हता. तेव्हा ज्ञानेश्वरांनी त्यांना उपदेश पर ६५ ओव्याचे पत्र लिहिले. तेच पत्र म्हणजे 'चांगदेव पासष्टी' ग्रंथ होय. तसेच संत ज्ञानेश्वराने हरिपाठच्या अभंगांमध्ये हरिनामाचे महत्त्व विशद केलेले आहे. अमृताअनुभव ग्रंथाच्या लेखनानंतर ज्ञानेश्वराने तीर्थयात्रा सुरू केली. याचा उल्लेख संत नामदेव महाराजांच्या 'तीर्थावली' ग्रंथात आढळून येतो. तीर्थयात्रेनंतर ज्ञानेश्वराने समाधी घेण्याचा निर्णय घेतला.ज्ञंनेश्वरांनी सन १२९६ मध्ये जिवंत समाधी घेतली. संत नामदेवाच्या समाधीच्या अभंगांमध्ये हा संदर्भ आपल्याला सापडतो ज्ञानेश्वराचा संयम आणि निग्रह, समाजाला झालेले दु:ख या सर्व गोष्टीचे प्रतिबिंब समाधीच्या अभंगात आढळते.

जो जे वांचिल। तो ते लाहो। असे म्हणत साऱ्या विश्वाची जणू काळजी वाहणाऱ्या संत ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदाय आदराने, प्रेमाने माऊली म्हणतात. त्यांनी धर्मातील क्लिष्ट आवडंबरे काढून ,धर्माला कर्तव्याचा वेगळा अर्थ दिला. वाङमय निर्मिती बरोबरच त्यांनी आध्यात्मिक लोकशाहीचे बीज रोवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. भागवत धर्माचा तसेच वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याचे अद्भुतपूर्वकार्य त्यांनी केले. सामान्य जनसमुदायाला संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञान उमगत नसल्याकारणाने ज्ञानेश्वरांनी भागवत गीता मराठीतून लिहिली. अध्यात्माच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

अशा महाराष्ट्राच्या पावन भूमीवर जन्माला आलेल्या, महान संत, योगी, कविवर्य 'श्री संत ज्ञानेश्वर माऊली' यांच्या अनमोल कार्याला कोटी कोटी प्रणाम.